**<u>शासकीय जमीन</u>**

**विविध प्रयोजनासाठी शासकीय जमीन कब्जेहक्काने अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या प्रकरणी झालेल्या शर्तभंगाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक : जमीन-२०२१/प्र.क्र.१२/ज-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दिनांक : २८ जानेवारी, २०२१

**<u>वाचा :</u>** महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.लेखाप १०/२०११/प्र.क्र.१५९/ज-१, दि.०३.०३.२०१२

**<u>शासन परिपत्रक</u>** :-

शासनाने राज्यात स्वातंत्र्यापूर्वी मुंबई जमीन महसूल संहिता, या संहितेनुसार आणि स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे विल्हेवाट करणे) नियम, १९७१ अन्वये शासकीय जमिनी विविध प्रयोजनासाठी विविध अटी व शर्तीवर कब्जेहक्काने किंवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या आहेत. अशा प्रदान केलेल्या जमिनींचा वापर दिलेल्या उदिष्टासाठीच होणे आवश्यक आहे. तसेच शासनाने अशा प्रकरणी दिलेल्या कालमर्यादेत ती जमीन वापरात आणणे आवश्यक आहे.

ज्या अटी व शर्तीवर शासकीय जमिनी प्रदान करण्यात आल्या आहेत, त्या अटी व शर्तीनुसार या जमिनीचा वापर झाला आहे किंवा नाही हे पहाण्याची जबाबदारी ही क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांची आहे. यासंदर्भात यापूर्वी उक्त वाचा येथील शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, असे असतांनाही काही प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

०२. या अनुषंगाने आपणांस पुन्हा कळविण्यात येत आहे की, अशा प्रकारे प्रदान केलेल्या जमिनीबाबत शर्तभंग झाला असेल, तर, अशी प्रकरणे स्वत:हून शोधून काढावित आणि त्यामध्ये अस्तीत्वात असलेल्या शासन धोरणानुसार कार्यवाही करावी. तसेच ज्या प्रकरणात शर्तभंगाकडे जाणिवपूर्वक दूर्लक्ष करुन कार्यवाही करण्यास टाळाटाळ होत असेल / झाली असेल, अशा प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी.



Scanned with OKEN Scanner

**०३.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१२८१५४२२७४३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(रमेश चव्हाण)**

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. राज्यमंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य, मुंबई

६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

७) अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.

९) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.

११) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.

१२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे.

१३) नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.

१५) सर्व विभागीय आयुक्त.

१६) सर्व जिल्हाधिकारी.

१७) सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.

१८) सर्व अवरसचिव/कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.

१९) सहसचिव (ज-१), यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०) निवड नस्ती ( ज-१).

******



Scanned with OKEN Scanner